महाराष्ट्र शासन

गृह (परिवहन) विभाग,
दुसरा मजला, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा
राजगुरु चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २०.०८.२०२५.

## आदेश

मोटार वाहन अधिनियम, १९८८

क्र.एमव्हीआर-०८२५/प्र.क्र.४५८/परि-२.

ज्याअर्थी, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाव्दारे गणेश चतुर्थी निमित्ताने कोकणवासीयांच्या सोयीसाठी जादा बसेस सोडण्याची व्यवस्था करण्यात येते,

ज्याअर्थी, राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ वरुन,जड वाहने व रेतीची वाहतूक करणारी वाहने यांच्या वाहतूकीमुळे या कालावधीत कोकणाकडे ये-जा करणाऱ्या वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढून वाहनांची कोंडी होऊन प्रवाशांची गैरसोय होते,

त्याअर्थी, आता, मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ११५ मधील तरतूदीचा वापर करुन महाराष्ट्र शासन या आदेशाव्दारे सार्वजनिक हितास्तव मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ वरुन होणारी वाळू / रेती भरलेल्या ट्रकची, मोठ्या ट्रेलर्सची तसेच अवजड वाहनांच्या वाहतूकीबाबत पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

१) **गणेशोत्सवाच्या पूर्व तयारीचा प्रवास / मुर्तीचे आगमण** - दिनांक २३.०८.२०२५ रोजी ००.०१ वाजेपासून ते दिनांक २८.०८.२०२५ रोजी रात्री २३.०० वाजेपर्यंत या कालावधीत मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ वर सर्व वाहने ज्यांची वजनक्षमता १६ टन किवा १६ टनापेक्षा जास्त आहे. (जड-अवजड वाहने, ट्रक, मल्टीएक्सल, ट्रेलर, ट्रक, लॉरी इ. वाहने) वाहतुकीस पूर्णत: बंद करण्यात यावी.

२) **५ व ७ दिवसांच्या गणपतीचे विर्सजन / गौरी गणपती विसर्जन/ काही अंशी परतीचा प्रवास -** दिनांक ३१.०८.२०२५ रोजी सकाळी ०८.०० वाजेपासून रात्री २३.०० वाजेपर्यंत आणि दिनांक ०२.०९.२०२५ रोजी सकाळी ०८.०० वाजेपासून रात्री २३.०० वाजेपर्यंत या कालावधीत मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ वर सर्व वाहने ज्यांची वजनक्षमता १६ टन किवा १६ टनापेक्षा जास्त आहे.(जड-अवजड वाहने, ट्रक, मल्टीएक्सल, ट्रेलर, ट्रक, लॉरी इ. वाहने) अशा सर्व वाहनांची वाहतूक पूर्णत: बंद करण्यात यावी.

३) **अनंत चुतर्दशी ११ दिवसांचे गणपती विसर्जन / परतीचा प्रवास -** दिनांक ०६.०९.२०२५ रोजी सकाळी ०८.०० वाजेपासून ते दिनांक ०७.०९.२०२५ रोजी रात्री २०.०० वाजेपर्यंत या कालावधीत मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ वर सर्व वाहने ज्यांची वजनक्षमता १६ टन किवा १६ टनापेक्षा जास्त आहे. (जड-अवजड वाहने, ट्रक, मल्टीएक्सल, ट्रेलर, ट्रक, लॉरी इ. वाहने) वाहतुकीस पूर्णत: बंद करण्यात यावी.

४) उपरोक्त अनुक्रमांक १ ते ३ नुसार मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ वर संपूर्ण प्रवास बंदी असलेल्या कालावधी व्यतिरिक्त उर्वरित कालावधीत अशी वाहने, ज्यांची वजन क्षमता १६ टन किंवा १६ टनांपेक्षा जास्त आहे. (जड-अवजड, मल्टीएक्सल, ट्रेलर, ट्रक्स, ट्रक, लॉरी) अशा वाहनांना दिनांक २८.०८.२०२५ रोजी २३.०० वाजेपासून ते दिनांक ३१.०८.२०२५ रोजी सकाळी ०८.०० वा. पर्यत व दिनांक ३१.०८.२०२५ रोजी रात्री २३.०० वाजेपासून ते दिनांक ०२.०९.२०२५ रोजी सकाळी ०८.०० वा. पर्यंत तसेच दिनांक ०२.०९.२०२५ रोजी रात्री २३.०० वाजेपासून ते दिनांक ०६.०९.२०२५ रोजी सकाळी ०८.०० वा. पर्यंत या वेळेत वाहतूकीस परवानगी राहील. तसेच सर्व वाहने दिनांक ०७.०९.२०२५ रोजी रात्री २०.०० वा. नंतर नियमित प्रवास करतील.

५) सदर निर्बंध जेएनपीटी बंदर व जयगड बंदर येथुन आयात-निर्यात मालाची वाहतूक करणारी वाहने, दूध, पेट्रोल, डिझेल, स्वंयपाकाचे गॅस सिलेंडर, मेडीसीन, लिक्वीड मेडीकल ऑक्सीजन, अन्न-धान्य, भाजी-पाला, नाशवंत माल इ. जीवनावश्यक वस्तू वाहून नेणाऱ्या वाहनांना लागू राहणार नाही.

६) तसेच मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ च्या रस्ता रुंदीकरण /रस्ता दुरुस्ती कामकाज आणि साहित्य, माल इ. ने-आण करणाऱ्या वाहनांना बंदी लागू राहणार नाही. यासंदर्भात वाहतूकदारांना संबंधित वाहतूक विभाग/महामार्ग पोलिस यांनी प्रवेशपत्र द्यावे.

७) कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांचा आणि महामार्गांचा विचार करुन पोलीस आयुक्त, नवी मुंबई आणि संबंधीत जिल्हयांचे पोलीस अधीक्षक यांनी जड / अवजड वाहनांवरील वाहतूकीचे निर्बंध शिथील करण्याबाबत प्राप्त परिस्थितीनुसार आपले स्तरावर योग्य तो निर्णय घ्यावा, तसेच जे.एन.पी.टी. व जयगड बंदरातून आयात-निर्यात मालाची वाहतूक सुरळीत राहील याकरीता वाहतुकीचे नियोजन करण्यात यावे. परंतु, वरील निर्बंधबंदी दूध, पेट्रोल/डिझेल, स्वयंपाकाचे गॅस सिलेंडर, लिक्वीड मेडिकल ऑक्सिजन, अन्न धान्य, भाजीपाला व नाशवंत माल इत्यादी जीवनावश्यक वस्तू वाहून नेणाऱ्या वाहनांना लागू राहणार नाही.

८) कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांचा आणि महामार्गांचा विचार करुन पोलीस आयुक्त, नवी मुंबई आणि संबंधीत जिल्ह्यांचे पोलीस अधीक्षक यांनी जड / अवजड वाहनांवरील वाहतूकीचे निर्बंध शिथील करण्याबाबत प्राप्त परिस्थितीनुसार आपले स्तरावर योग्य तो निर्णय घ्यावा, तसेच जे.एन.पी.टी. व जयगड बंदरातून आयात-निर्यात मालाची वाहतूक सुरळीत राहील याकरीता वाहतुकीचे नियोजन करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(राजेंद्र होळकर)
शासनाचे सह सचिव

प्रति,
१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. पोलीस आयुक्त, ठाणे / नवी मुंबई.
५. जिल्हा दंडाधिकारी (मुंबई-शहर/उपनगरे/ठाणे/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग).
६. पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रामीण)/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग.

७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, या आदेशास सर्व प्रमुख वृत्तपत्र, दूरदर्शन व न्युज चॅनेल या प्रसार माध्यमांव्दारे ठळक प्रसिद्धी देण्यात यावी.
८. प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे/पनवेल.
९. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, वाशी/पेण/रत्नागिरी/सिंधुदूर्ग.

प्रत माहितीसाठी :-

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. उप सचिव (पोल-८), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.